# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:27.01.2025** **वार:सोमवार**

---

**ठळक बातम्या**

1) 76 वा प्रजासत्ताक दिन देशभरात उत्साहात साजरा, दिल्लीत कर्तव्य पथावर देशाच्या लष्करी सामर्थ्याचं आणि समृद्ध सांस्कृतिक परंपरेचं दर्शन

2) राज्यातही प्रजासत्ताक दिनानिमित्त जिल्हा मुख्यालयांमध्ये ध्वजारोहण; सशक्त महाराष्ट्र घडवण्याचा संकल्प करण्याचं राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांचं आवाहन

3) जीबीएस आजारावर पुण्यात मोफत उपचार करणार असल्याची उपमुख्यमंत्री अजित पवार यांची घोषणा

4) संत साहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक डॉ. अशोक कामत यांचं पुण्यात निधन

आणि

5) नाशिकमध्ये झालेल्या रणजी सामन्यात महाराष्ट्राची बडोदा संघावर 429 धावांनी मात

**प्रजासत्ताक दिन**

संपूर्ण देशभरात 76 वा प्रजासत्ताक दिन काल देशभक्तीमय वातावरणात उत्साहात साजरा करण्यात आला. नवी दिल्लीतल्या कर्तव्यपथावर झालेल्या संचलनाची मानवंदना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी स्वीकारली. देशाच्या लष्करी सामर्थ्याचं आणि समृद्ध सांस्कृतिक परंपरेचं दर्शन या संचलनातून घडलं. देशाची तीनही सेनादलं, सीमासुरक्षा तसंच तटरक्षक दल, सशस्त्र पोलीस दलं, राष्ट्रीय छात्रसेना, अशी अनेक पथकं संचलनात सहभागी झाली होती. विविध राज्यांचे तसंच मंत्रालयांचे आकर्षक चित्ररथही संचलनात सहभागी झाले होते. स्वर्णिम भारत परंपरा आणि विकास ही यंदाच्या संचलनाची संकल्पना होती. इंडोनेशियाचे अध्यक्ष प्रबोवो सुबियंतो या सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या सोहळ्यापूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हुतात्मा स्मारकावर पुष्पचक्र अर्पण करुन आदरांजली वाहिली.

**राज्य प्रजासत्ताक दिन**

राज्यातही प्रजासत्ताक दिन अत्यंत उत्साहात साजरा झाला. ऐकुया याबाबतचा हा वृत्तांत......

मुंबईत शिवाजी पार्क मैदानावर आयोजित मुख्य शासकीय सोहळ्यात राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते ध्वजारोहण झालं. सर्व समाजघटकांना सोबत घेऊन सर्वसमावेशक, प्रगतीशील, पुरोगामी आणि विकसित महाराष्ट्र घडविण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध असल्याची ग्वाही राज्यपालांनी दिली.

सर्वांनी एकत्र येऊन नवीन आणि सशक्त महाराष्ट्र घडवण्याचा संकल्प करूया; एक ट्रिलियन डॉलरच्या अर्थव्यवस्थेचं स्वप्न साकार करण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे काम करूया, असं आवाहन त्यांनी केलं. विधान भवनात विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे यांनी तिरंगा फडकावला. विधान परिषदेच्या उपसभापती डॉक्टर नीलम गोऱ्हे, यांच्यासह विधानमंडळ सचिवालयाचे अधिकारी आणि कर्मचारीही यावेळी उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वर्षा या शासकीय निवासस्थानी राष्ट्रध्वज फडकावून मानवंदना दिली. यावेळी पोलीस दलाच्या पथकानं राष्ट्रध्वजाला सलामी दिली. यावेळी बोलताना मुख्यमंत्री म्हणाले......

**भारतीय प्रजासत्ताक चिरायु होवो आणि आमचे संविधान हे जगातले सर्वोत्तम संविधान आहे , हे अशाच प्रकारे आम्हाला विकासाचा आणि समतेचा मार्ग दाखवत राहो. अशा प्रकारच्या शुभेच्छा व्यक्त करतो** .

मुंबईकरांचा प्रवासाचा वेळ आणि इंधनाची बचत करण्यामध्ये महत्त्वाची भूमिका निभावू शकणाऱ्या धर्मवीर स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज मुंबई किनारी रस्त्याच्या उत्तर वाहिनीचं लोकार्पण मुख्यमंत्र्यांच्या हस्ते काल करण्यात आलं. उपमुख्यमंत्री आणि ठाण्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते ठाण्यातील साकेत मैदानातील पोलिस क्रिडा संकुलामध्ये ध्वजारोहण करण्यात आलं, यावेळी संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानातील जिल्हास्तरीय पुरस्कार प्राप्त ग्रामपंचायती, गुणवंत क्रीडापटू, क्रीडा मार्गदर्शक आणि पोलिस सेवेतील विशेष उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा शिंदे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुण्यातल्या शिवाजीनगर इथल्या पोलीस कवायत मैदानात झालेल्या कार्यक्रमात ध्वजवंदन केलं. यावेळी बोलताना ते म्हणाले...

**गेल्या 75 वर्षामध्ये उल्लेखनीय प्रगती केली, या प्रगतीचे श्रेय देशाच्या राजकीय सामाजिक शैक्षणिक उओद्योगिक आर्थिक क्षेत्राच्या नेतृत्वाने जी मेहनत घेतली कार्यकर्त्यांनी जी साथ दिली त्यांच्या त्या मेहनतीला आहे.**

लष्कराच्या पुण्यातील दक्षिण मुख्यालायातही प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. युद्ध स्मारकावर हुतात्मा जवानांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. प्रजासत्ताक दिनानिमित्त नंदुरबार जिल्ह्यातल्या तळोदा इथल्या न्यायालयाच्या नूतन इमारतीचं उद्घाटन काल मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश किशोर संत यांच्या हस्ते करण्यात आलं. कोल्हापूरमध्ये पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमात महाराष्ट्र क्षयमुक्त करण्यासाठी सर्वांनी सहभागी व्हावं असं आवाहन केलं, यावेळी निक्षय वाहन चित्ररथाद्वारे क्षयरोगाविषयी जनजागृती करण्यात आली. धुळे जिल्ह्यात पालकमंत्री जयकुमार रावल यांच्या हस्ते धुळे जिल्हा पोलीसांच्या नव्या संकेतस्थळाचं उद्घाटन करण्यात आलं.साताऱ्यात पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी ध्वजवंदन केलं. शिवकालीन युद्ध कला प्रत्यक्षिकांचं सादरीकरण यावेळी करण्यात आलं. राज्यातील सर्वच जिल्हा मुख्यालयांच्या ठिकाणी पालकमंत्री, जिल्हाधिकारी आदी मान्यवरांच्या उपस्थितीत ध्वजवंदन झालं. विविध शाळा, महाविद्यालयं, संस्था,

संघटना आणि गृहनिर्माण संस्थांमध्येही प्रजासत्ताक दिनानिमित्त सामाजिक सांस्कृतिक उपक्रमांचं आयोजन करण्यात आलं होतं. प्रजासत्ताकदिनानिमित्त सर्वच शासकीय इमारतींना आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती.आकाशवाणी बातम्यांसाठी आमच्या ठिकठीकाणच्या बातमीदारांसह योगेश रांगणेकर पुणे

**गुइलेन बॅरीसिंड्रोम मोफत उपचार**

गेल्या काही दिवसांपासून गुइलेन बॅरी सिंड्रोम या दुर्मिळ आजाराच्या रुग्णसंख्येत वाढ होत आहे. आतापर्यंत या आजाराने दोन जण दगावले आहेत. हा आजार असलेल्या रुग्णांची संख्या 73 झाली आहे. काही रुग्ण जीवरक्षक प्रणालीवर असून या आजाराचा खर्च देखील मोठा आहे. त्यामुळे या आजारावर मोफत उपचार केले जातील अशी घोषणा उपमुख्यमंत्री आणि पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमात केली. जीबीएस आजारावर पुण्यातील कमला नेहरु रुग्णालयात आणि पिंपरी चिंचवडमध्ये वायसीएम रुग्णालयात मोफत उपाचार करण्यात येणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

**विद्यापीठ - देवळाणकर**

आर्थिक उदारीकरणानंतरही शिक्षणाचं क्षेत्र दुर्लक्षितच होतं,मात्र राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानं यात हेतूपूर्वक हस्तक्षेप करून  शिक्षणाचं आंतरराष्ट्रीयीकरण आणि व्यापक लोकशाहीकरण केलं, असं मत राज्याचे उच्च शिक्षण संचालक डॉकटर शैलेंद्र देवळाणकर यांनी  व्यक्त केलं. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्यावतीनं कुसगाव इथं आयोजित प्राचार्य आणि  संचालकांच्या निवासी कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते काल बोलत होते. राष्ट्रनिर्मितीमध्ये प्राचार्य, संचालक आणि शिक्षकांची संस्थात्मक जबाबदारी आणि व्यक्तिगत पातळीवरची सिद्धता ही खूप महत्त्वाची असल्याचं सांगत शिक्षणसंस्था, शिक्षक आणि प्राचार्य हे परिवर्तनाचा दुवा आहेत,असंही ते  यावेळी  म्हणाले.

**ई- वेस्ट**

आजच्या काळात तंत्रज्ञान वेगाने बदलत असल्यानं इलेक्ट्रॉनिक उपकरणंही लवकर बदलावी लागतात,म्हणूनच ई-वेस्ट अर्थात इलेक्ट्रॉनिक कचरा तयार होण्याचं प्रमाण खूप मोठं आहे. ई-कचऱ्याच्या निर्मितीत भारताचा जगात तिसरा क्रमांक लागतो. या कचऱ्याची योग्य पद्धतीनं विल्हेवाट न लावल्यास किंवा पुनर्वापर न केल्यास हवा, पाणी आणि जमिनीचं प्रदूषण होतं, असं  मत पुण्यातल्या पूर्णम इकोव्हिजन फाउंडेशन या संस्थेच्या दक्षता परब यांनी व्यक्त  केलं. त्या काल रत्नागिरीत आयोजित . ई-यंत्रण उपक्रमाचं रत्नागिरीतलं प्रातिनिधिक उद्घाटन करताना  बोलत  होत्या. रत्नागिरी शहराच्या विविध भागांमध्ये 15 संकलन केंद्रांच्या  माध्यमातून ई-कचऱ्याचं  संकलन  काल  करण्यात  आलं. प्रजासत्ताक दिनाच्यानिमित्त पुण्यातील पूर्णम इकोव्हिजन फाउंडेशननं  अन्य संस्थांच्या मदतीनं महाराष्ट्र, गोवा आणि कर्नाटकमधल्या एकूण वीस शहरांमध्ये हा ई-कचरा संकलनाचा उपक्रम राबवला. त्यासाठी सातशेहून अधिक ठिकाणी संकलन केंद्रं तयार करण्यात आली होती.

**कामत निधन**

संत वाङ्मयाचे अभ्यासक डॉ. अशोक कामत यांचं काल सकाळी पुण्यात त्यांच्या राहत्या घरी निधन झालं, ते 83 वर्षांचे होते. वारकरी संप्रदायाबरोबरच, नाथ, आणि समर्थ संप्रदाय, वीरशैव आणि शीख संप्रदायाचा भारतीय पातळीवर तौलनिक विचार करणारे त्यांचे अनेक ग्रंथ, शोधनिबंध प्रसिद्ध आहेत. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील नामदेव अध्यासनाचं प्रमुखपद त्यांनी अनेक वर्ष सांभाळलं. अशोक कामात यांच्या निधनानं साहित्य क्षेत्रातील मोठं व्यक्तिमत्व हरपलं असल्याची भावना ज्येष्ठ लेखक संशोधक डॉक्टर राजा दीक्षित यांनी व्यक्त केल्या. ते म्हणाले.

**डॉ अशोक प्रभाकर कामत हे महाराष्ट्रातील विद्वातेच्या क्षेत्रातील आणि विशेषतःसंत साहित्याच्या क्षेत्रातील एक अतिशय मोठ नाव आहे विद्यापीठातल संत नामदेव अभ्यासाचं अतिशय उत्तम काम त्यांनी केलं त्या आधारे त्यांनी महाराष्ट्रातील संशोधन प्रकल्प राबवले स्वतः त्यांची जी साहित्य निर्मिती आहे ती तर महत्वाची आहे महाराष्ट्रातल्या संत विषयक वाग्मयामध्ये डॉक्टर अशोक कामत यांचे योगदान ते खूप मोठा आहे आणि वेगवेगळ्या संस्थांचीही त्यांचा संबंध होता त्यांच्या वाङ्मयाद्वारे आणि त्यांच्या समाजकार्याद्वारे त्यांनी एक फार मोठा ठसा घेतल्या सामाजिक सांस्कृतिक जीवनामध्ये उमटवला .**

**क्रिकेट**

नाशिक इथं झालेल्या रणजी सामन्यात महाराष्ट्राने बडोद्याचा 429 धावांनी दणदणीत पराभव केला. पहिल्या डावात मिळालेल्या आघाडीच्या बळावर महाराष्ट्राने बडोद्यासमोर विजयासाठी 616 धावांचं आव्हान दिलं होतं. या आव्हानाचा पाठलाग करतांना बडोद्याचा संघ अवघ्या 187 धावाच करु शकला.

**हवामान**

राज्यात आज सर्वत्र हवामान कोरडं राहण्याचा अंदाज वेधशाळेनं वर्तवला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**